महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१३ वे | दिनांक : २७/०७/२०२६ | वार : सोमवार

## हा राजीनामा मराठ्यांचा इतिहास पुसणाऱ्यांना धडा, जयंत पाटलांची टीका



**मुंबई** : नीट पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरात विद्यार्थ्यांनी छेडलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी या राजीनाम्याचे स्वागत करत तो विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा विजय असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर, प्रधान यांच्या कार्यकाळात एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांमधून मराठा साम्राज्याच्या इतिहासाशी छेडछाड करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच प्रधानांचा राजीनामा मराठ्यांचा इतिहास पुसण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी धडा असल्याचे जयंत पाटील यांनी म्हटले.

जयंत पाटील म्हणाले की, "नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले. पोलिसांचा लाठीचार्ज सहन करत जवळपास महिनाभर सुरू असलेल्या या लढ्यामुळे अखेर धर्मेंद्र प्रधान यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. हा विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा आणि संघर्षाचा मोठा विजय आहे."

धर्मेंद्र प्रधान यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर भाजप नेत्यांकडून सुरू असलेल्या सोशल मीडिया मोहिमेवर जयंत पाटील यांनी आक्षेप घेतला. "प्रधानांच्या राजीनाम्यानंतर केंद्र आणि राज्यातील अनेक भाजप नेते तसेच सत्ताधारी लोकप्रतिनिधी सोशल मीडियावर धर्मेंद्र प्रधान यांच्या समर्थनार्थ भूमिका मांडत आहेत. प्रधान यांच्यावर अन्याय झाला किंवा त्यांनी चांगले काम करूनही राजीनामा द्यावा लागला, असा माहोल निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे," अशी टीकाही त्यांनी केली.

जयंत पाटील यांनी आपल्या पोस्टमध्ये एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमातील बदलांचा मुद्दा उपस्थित केला. "धर्मेंद्र प्रधान यांच्या कार्यकाळात इयत्ता आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या पुस्तकातून इ.स. 1759 मधील मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा वगळण्यात आला. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी जोडलेल्या मराठा इतिहासाशी छेडछाड करण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली झाले," असा आरोप त्यांनी केला.

"या पार्श्वभूमीवर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याकडे केवळ एका मंत्र्याच्या पदत्यागाच्या दृष्टीने न पाहता, मराठ्यांचा जाज्वल्य इतिहास पुसण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाही हा धडा असल्याचे म्हणणे वावगे ठरणार नाही," असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

## शिंदेंचा राहुल गांधींवर घातपाताचा आरोप

**मुंबई** : 'नीट' परीक्षा घोटाळा ही अत्यंत दुर्दैवी घटना असून, या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तत्काळ कठोर पावले उचलली आहेत. या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी उद्या संसदेत नवा कायदा मांडला जाणार असून, त्यात 10 वर्षांची सक्तमजुरी आणि 10 कोटी रुपयांच्या दंडाची तरतूद असणार आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांचे आंदोलन हे मूळतः अराजकीय होते; मात्र राहुल गांधी आणि महाराष्ट्रातील पराभूत नेत्यांनी देशात बांगलादेश किंवा श्रीलंकेसारखी अराजकता माजवण्यासाठी या आंदोलनाचा राजकीय वापर केला, असा खळबळजनक आणि गंभीर आरोप राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. माध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतलेल्या धडक निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले, "नीट पेपर लीक होणे ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेचे गांभीर्य पंतप्रधान मोदी यांनी घेतले आणि तत्काळ नवीन कायदा करण्याचा निर्णय घेतला. याबाबत उद्या संसदेत बिलही येईल. त्यामध्ये 10 वर्ष सक्त मजुरी आणि 10 कोटी रुपये दंड, केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालणार, अशी तरतूद असणार आहे." एकनाथ शिंदे म्हणाले, "याशिवाय एनटीएमधील 427 लोकांना काढून टाकले. तसेच जे आरोपी आहेत, त्यांना जेरबंद केलेले असून सीबीआय त्यांची चौकशी करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: सांगितलेले आहे की, कुणालाही यामधून सुटका नाही. या प्रकरणात सापडणाऱ्या प्रत्येकावर कठोर कारवाई केली जाईल."

## श्रीकांत शिंदे केंद्रीय शिक्षणमंत्री होणार?



**मुंबई** : केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे सीजेपीच्या आंदोलनाला यश मिळाले असून, या महत्त्वपूर्ण घडामोडीनंतर आता एक नवीन राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या शिक्षण खात्याचा अतिरिक्त कार्यभार प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपवण्यात आला असला तरी, भविष्यात या पदावर खासदार श्रीकांत शिंदे यांची वर्णी लागू शकते का, या सुरू असलेल्या चर्चेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांनी भाष्य केले आहे.

सुनील तटकरे यांना श्रीकांत शिंदे यांची वर्णी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या पदावर जाऊ शकतात का? असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, तो निर्णय नरेंद्र मोदी, अमित शाह यांचा असतो. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेला उज्वल असे यश महाराष्ट्रमध्ये मिळाले. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे ६ खासदार विलीन झाले. शिंदे साहेबांनी ताकद लोकशाहीच्या माध्यमातून सिद्ध केली. केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होत असतो, त्या संदर्भात निर्णय एनडीएचे नेतृत्व घेत असते. नेमक्या किती जागा शिवसेनेला द्यायच्या, कोणत्या पक्षाला द्यायचे हा अधिकार त्यांचा आहे. तो दिल्यानंतर कोणाला मंत्री करावे, हा अधिकार एकनाथ शिंदे यांचा आहे, असे तटकरे यांनी म्हटले आहे.

मुंबईत आज उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी विजयी सभा घेतली. त्यावर प्रतिक्रिया देताना सुनील तटकरे म्हणाले, शेवटी कोणी कोणत्या विषयावरती काय भावना व्यक्त कराव्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानानुसार सर्वांना अधिकार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीन दिवस विद्यार्थी संवाद केला. चर्चा करण्यासाठी निरोप पाठवले. नवीन पिढीमध्ये असलेल्या भावना याचा सन्मान मोदी करत आहेत. लोकशाहीच्या पद्धतीने निर्णय झाला असल्याचे तटकरे यांनी म्हटले.

तसेच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विलीनीकरण होणार आहे का, यावर उत्तर देताना सुनील तटकरे म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत यापूर्वीच सुप्रियाताई, श्रीकांत शिंदे यांनी मत व्यक्त केले आहे. परंतु, राजकारणामध्ये आपण म्हणतात त्याप्रमाणे आज तरी दोन्ही राष्ट्रवादी विलीन करण्याची चर्चा कुठेही नाही. योगयावेळी तशा प्रकारची चर्चा सुरू झाली तर त्यावेळी विचार करता येईल. मात्र आता विलीनीकरणाची चर्चा पूर्णपणे बंद आहे, असे तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २७ जुलै २०२६

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडीचा पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा ही २५ एप्रिल २०२६ रोजी केंद्र गल्ले बोरगाव या परीक्षा केंद्रावर दिली होती.शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील नुकताच निकाल लागला असून परीक्षेत एकुण प्रविष्ट १३,पात्र विद्यार्थी ११, एकुण ८४.६१ टक्के निकाल मिळवून शाळेची उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या परीक्षेत कु. भावना रामदास मेंगाळ हिने प्रथम क्रमांक, कु रोहित रामदास मेंगाळ याने द्वितीय क्रमांक, तर कु. पुजा रामनाथ पथवे हिने तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन तसेच पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## गावातील मुलापासून राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या मुख्याध्यापकापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास : प्राचार्य डॉ. हारून बशीर यांचा गौरवपूर्ण सेवानिवृत्ती सोहळा




**जळगाव (प्रतिनिधी)** : इक्रा एज्युकेशन सोसायटी संचलित इक्रा उर्दु हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सालार नगर, जळगाव येथे राष्ट्रीय पुरस्कार विजेते प्राचार्य डॉ. हारून बशीर आणि ज्येष्ठ गणित शिक्षक अब्दुल कय्युम सर यांच्या गौरवपूर्ण सेवानिवृत्तीनिमित्त भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे दोन आधारस्तंभ असलेल्या या मान्यवर शिक्षकांच्या नि:स्वार्थ सेवेला मानवंदना देण्यासाठी व्यवस्थापन, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम भावनिक आणि अविस्मरणीय क्षणांनी भारावून गेला.यावेळी ज्येष्ठ गणित शिक्षक अब्दुल कय्युम सर यांनी आपल्या प्रदीर्घ अध्यापन प्रवासाच्या आठवणींना उजाळा देताना भावना अनावर झाल्या. विद्यार्थ्यांप्रती असलेले त्यांचे प्रेम आणि अध्यापनाची अखंड ओढ व्यक्त करत त्यांनी भविष्यात शाळेला गरज भासल्यास गणित विषयाचे अध्यापन करण्यासाठी सदैव तत्पर राहण्याची उदात्त भावना व्यक्त केली.राष्ट्रीय पुरस्कार विजेते प्राचार्य डॉ. हारून बशीर यांनी आपल्या प्रेरणादायी मनोगतात शाळेच्या उभारणीसाठी केलेल्या अथक परिश्रमांचा प्रवास उलगडला. रक्त, घाम आणि अश्रूंचे मोल देत उभारलेल्या या संस्थेच्या यशामागे विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक, मित्रपरिवार, कुटुंबीय आणि इक्रा एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापनाचे अमूल्य सहकार्य लाभल्याबद्दल त्यांनी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. एका छोट्याशा गावातील मुलगा राष्ट्रीय पुरस्कार विजेता प्राचार्य बनण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा सर्वांच्या विश्वास, सहकार्य आणि आशीर्वादामुळेच शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी त्यांनी विद्यमान प्राचार्यांना आपल्या अपूर्ण स्वप्नांची, दूरदृष्टीची आणि शाळेच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयाची पूर्तता करण्याचे वचन देण्याचे भावनिक आवाहन केले. सेवानिवृत्ती हा आपल्या कार्याचा शेवट नसून नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे सांगत शिक्षणक्षेत्रातील आपली वाटचाल नव्या जोमाने सुरूच राहील, असा दृढ विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात इक्रा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार, चेअरमन एस. एम. जफर, संचालक अब्दुल रऊफ शेख, संचालक अब्दुल रशीद शेख, संचालक एजाज अहमद मलिक, संचालक अमीन बदलीवाला, सदस्य आसिफ शाह यांच्यासह अनेक मान्यवर, शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत डॉ. हारून बशीर यांच्या कार्याचा गौरव केला. समाजासमोर शाळेला शैक्षणिक उत्कृष्टतेचे आदर्श केंद्र म्हणून उभे करण्यात त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे सर्वांनी गौरवोद्गार काढले.समारंभाचा समारोप सर्व उपस्थित मान्यवर, शिक्षक, कर्मचारी आणि पाहुण्यांसाठी आयोजित भव्य स्नेहभोजनाने उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

## अंबरनगर ग्रामस्थांकडून आमदार बसवराज पाटील यांचा सत्कार



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून महाराष्ट्रात सर्वाधिक मतांनी विजयी झाल्याबद्दल आमदार बसवराज पाटील यांचा अंबरनगर ग्रामस्थांच्या वतीने रविवारी (ता. २६) रोजी सत्कार करण्यात आला.सरपंच किसन जाधव आणि माजी सरपंच धनू पवार यांच्या हस्ते आमदार बसवराज पाटील यांना शाल, फेटा व हार घालून सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्त्यांचे सहअध्यक्ष शरण पाटील यांचाही पोमा पवार आणि धनू जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी संवाद साधताना आमदार बसवराज पाटील यांनी अंबरनगर येथील स्मशानभूमीचा प्रश्न आणि इतर अडचणी लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले. तसेच, या संदर्भातील समस्यांवर चर्चा करण्यासाठी लवकरच विशेष बैठक घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या दौऱ्यादरम्यान ग्रामस्थांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांची सदिच्छा भेट घेतली; यावेळी त्यांनीही अंबरनगरच्या विकासात्मक प्रश्नांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.सत्कार सोहळ्यासह या प्रसंगी धनू जाधव, चंद्रकांत जाधव, भीमा राठोड, देविदास राठोड, दासू राठोड, रोहिदास पवार, बाबू जाधव, वसंत जाधव, विलास जाधव, राजेंद्र जाधव, गुलाब जाधव, संजय जाधव, दिनेश जाधव, हर्षवर्धन जाधव, कार्तिक जाधव, सचिन राठोड यांच्यासह अंबरनगरचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २७ जुलै २०२६

## श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची भक्तिमय दिंडी; चापानेर बसस्थानक दुमदुमले 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने



**चापानेर (प्रतिनिधी) :** श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांमध्ये संतपरंपरेचे संस्कार, भक्तीभाव आणि भारतीय संस्कृतीची जपणूक व्हावी या उद्देशाने अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच विविध साधू-संतांच्या वेशभूषेत सजून पारंपरिक वारकरी दिंडी काढली.टाळ, मृदंग, भगवे पताके, तुळशीच्या माळा आणि वारकरी वेशभूषेने सजलेल्या या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल", "जय जय राम कृष्ण हरी" अशा अखंड नामघोषाने वातावरण विठ्ठलमय झाले. दिंडी शाळेपासून चापानेर बसस्थानकापर्यंत काढण्यात आली.चापानेर बसस्थानकावर विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायातील विविध अभंगांचे सुरेल सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विठ्ठलभक्तीवर आधारित भक्तिगीतांवर आकर्षक नृत्य सादर केले. या भक्तिमय सादरीकरणाला प्रवासी, ग्रामस्थ आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. काही नागरिकांनी या उपक्रमाचे चित्रीकरण करून सामाजिक माध्यमांवरही प्रसारित केले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांच्या जीवनकार्याची माहिती देण्यात आली. संतांनी समाजाला दिलेला समता, बंधुभाव, मानवता, सेवा आणि भक्तीचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक वारशाबद्दल अभिमान निर्माण होतो, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले.यावेळी संस्था अध्यक्ष श्री दशरथ सोमासे यांच्यासह संचालक केतन पवार हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कौशल्या सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप वाकडे, वर्षा जाधव, सुषमा मगर , दुर्गा वैष्णव, दिव्या लोखंडे,भारती पवार, शामबाला पवार, पूजा तोडावत, ममता कोल्हे, चंदा घुले आदी शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचारी अंकुश राठोड, कविता हिरे, राजू राठोड आदींनी परिश्रम घेतलेज्ञान, संस्कार आणि संस्कृती यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूलने आषाढी एकादशीचा उत्सव केवळ साजरा न करता, वारकरी परंपरेचा पवित्र संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचेही मोलाचे कार्य केले.

## स. भु. प्रशालेत भाईंची ८३ वी जयंती उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** श्री. सरस्वती भुवन प्रशाला, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्तीसंग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांची 83 वी जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त आयोजित वर्गकार्यक्रमात 7 वी फ वर्गातील विराज कुलकर्णी गोविंदभाईंच्या वेशभूषेत आला होता. समृद्धी माळी, गायकवाड रणवीरसिंह, मुंडे श्लोक, स्रग्वी पाठक यांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. स्रग्वी पाठक आणि भार्गवी जोशी यांनी स्वरचित कविताचे सादरीकरण केले तसेच प्रणवी गानू, स्वरागी कुलकर्णी, याज्ञी मोकाटे, साईप्रसाद पुजारी, गार्गी दायमा, राधिका चक्रे, स्वराज खवल ,सोहम चव्हाण यांनी भित्तीपत्रके तयार केली.विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखिताचे विमोचन करण्यात आले. श्री. ज्ञानप्रकाश मोदानी यांनी गोविंदभाईंच्या जीवन मूल्यांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. व्यासपीठावर मुख्याध्यापक श्री.विश्वरूप निकुंभ, विजय चापाईतकर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमासाठी वर्गशिक्षिका चंद्रमा बानाटे व शुभांगी पांगरकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांचे सहकार्य मिळाले.

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

## धीर धरा तुम्ही मित्रांनो!

धीर धरा तुम्ही मित्रांनो!
आपलीही येईल वेळ,
संकटातून सावरताना,
जगतांना लागेल मेळ. १

कधीतरी आपलीही,
येणारच आहे वेळ.
जीवनात जगतांना,
कधीही बदलतो खेळ. २

काहीही टिकणार नाही,
कायमचे जास्त वेळ.
आज माझा उद्या तुझा,
संपणारच आहे खेळ. ३

सुख असो की दु:ख,
सतत संघर्ष करावे.
संकटांशी लढतांना,
जीवनी सप्तरंग भरावे. ४

कधी कधी स्वत:साठी,
प्रत्येकाने द्यावे वेळ.
तेव्हाच कुठे लागतो,
दु:खाचा सुखाशी मेळ. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry , MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २७ जुलै २०२६

# श्री सरस्वती भुवन प्रशालेत आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरणात कार्यक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** श्री सरस्वती भुवन प्रशालेत आषाढी एकादशीनिमित्त अत्यंत भक्तिमय वातावरणात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अभंग, भजन, नामस्मरण तसेच विठ्ठल-रुक्मिणी वेशभूषेद्वारे वारकरी परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. संपूर्ण विद्यालय परिसर "विठ्ठल... विठ्ठल..." या नामघोषाने दुमदुमून गेला.या प्रसंगी संगीत शिक्षिका माया मुळे यांनी विठ्ठलभक्तीपर गीते सादर करून कार्यक्रमात भक्तिरसाची अनुभूती निर्माण केली. मुख्याध्यापक श्री विश्वरूप निकुंभ व पर्यवेक्षक श्री विजय चापाईतकर यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम संपन्न झाला. सांस्कृतिक विभाग प्रमुख सीमा मुंडा यांच्या नियोजनातूनशुभांगी पांगरकर, चंद्रमा बानाटे, संध्या चोले, दिपाली सोळंके, स्नेहा सोनेकर तसेच विजय पिंपळे, विजय पाताळयंत्री व सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने कार्यक्रम यशस्वीरीत्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांमधून भारतीय संस्कृती ,वारकरी परंपरा यांची जपणूक व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# जागतिक शांततेसाठी योग हाच एक प्रभावी मार्ग



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जगभरात सध्या सुरू असलेले युद्धजन्य वातावरण व त्यात अमेरिका, इराण आणि इजराईल यांच्यातील वाढत चाललेला तणाव आणि त्यातून निर्माण होणारी मानवी व आर्थिक हानी हया बाबी लक्षात घेता, संपूर्ण जगात शांततेसाठी योग व प्राणायाम आणि ध्यानाचा प्रचार , प्रसार होणे ही काळाची खरी गरज असल्याचे प्रतिपादन जिंतूर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष व शासकीय योग प्रशिक्षक वैद्य शिवप्रसाद सानप यांनी आज उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.मेडिटेक हॉस्पिटलच्या नित्य योग व प्राणायाम वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, योग ही केवळ व्यायामपद्धती नसून मन, बुद्धी आणि भावनांचा समतोल साधणारे एक उत्तम भारतीय जीवनदर्शन आहे. योगामुळे ताण-तणाव कमी तर होतोच पण आपली निर्णयक्षमता वाढते त्यामुळे क्रोध , राग , द्वेष व आक्रमकतेवर अगदी सहज नियंत्रण प्राप्त करता येऊन शांततापुर्व संवादाला एक प्रकारे योग्य चालना मिळते. वैद्य शिवप्रसाद सानप यांनी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना आवाहन करताना म्हटले की येणाऱ्या दि. 21 जून 2027 रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अमेरिका, इराण आणि इजराईल या देशांच्या प्रमुखांना भारतात निमंत्रित करून भारतीय योगगुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांना योग व प्राणायाम आणि ध्यानाचे विशेष प्रशिक्षण आयोजित करुन याद्वारे भारताचा "वसुधैव कुटुंबकम्" हा संदेश संपूर्ण जगापर्यंत पोहोचवायला शांततेसाठी एक नविन पर्याय उपलब्ध होईल."योग हा युद्धाचा नव्हे, तर शांततेचा मार्ग आहे. शस्त्रांपेक्षा संयम, संघर्षापेक्षा संवाद आणि वैरापेक्षा मानवता ही अधिक सामर्थ्यवान आहे," असेही त्यांनी यावेळी नमूद केले.कार्यक्रमात संजीवन व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. योगेश दहिफळे यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी तसेच कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रत्येकाने दररोज नित्य योग व प्राणायाम आणि ध्यानाचा नियमित सराव करावा. निरोगी व्यक्ती, निरोगी कुटुंब आणि निरोगी समाज घडविण्यासाठी योग ही प्रभावी जीवनशैली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील डॉ ज्ञानेश्वर मुटकुळे , डॉ भागवत सांगळे , डॉ निशांत मुंढे , डॉ शाम बोरा , दामोधर सांगळे , बालाजी राख व सर्व सामाजिक कार्यकर्ते आणि योगसाधक बांधव उपस्थित होते.

# मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराच्या नियोजनाला वेग



**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि. 6 ऑगस्ट रोजी आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल येथे आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराच्या पूर्वनियोजनाचा आढावा घेण्यासाठी आज प्रशासनासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीस मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, महाराष्ट्र राज्याचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा शिबिराचे आयोजक सुरेश (अण्णा) धस प्रमुख उपस्थित होते. बैठकीत शिबिराचे नियोजन, रुग्णांची तपासणी, उपचार व्यवस्था, वाहतूक, समन्वय आणि विविध विभागांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी आमदार सुरेश धस यांनी रुग्णांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी तपासणी प्रक्रिया अधिक सहज, सुलभ आणि वेगवान करण्याच्या सूचना दिल्या. मतदारसंघातील प्रत्येक गावातील नागरिकांना त्यांच्या परिसरातील किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक तपासणी करून त्यानंतर पुढील उपचारासाठी आष्टी येथे आणण्याबाबत नियोजन करण्यात आले.बैठकीत महिलांमध्ये विशेषतः गर्भाशयाच्या आजारांचे वाढते प्रमाण, ग्रामीण भागातील व ऊसतोड मजूर महिलांच्या आरोग्य समस्या, तसेच गुडघेदुखी, कॅन्सर आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. या शिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक रुग्णांची तपासणी, निदान, उपचार तसेच पुढील शस्त्रक्रिया व विशेष उपचारासाठी आवश्यक ते मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.आष्टी–पाटोदा–शिरूर मतदारसंघातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांवर प्राथमिक तपासणी सुरू करण्यात आली असून तपासणी झालेल्या रुग्णांची अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या साहाय्याने दि. 6 ऑगस्ट रोजी आष्टी येथे पुढील तपासणी व आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत. या मोफत महाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी समन्वयक स्वानंद सोनार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर,उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, तहसीलदार निल्लेवाड, वैद्यकीय अधीक्षक रामदास मोराळे,तालुका आरोग्य अधिकारी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कर्मचारी, विविध विभागांचे डॉक्टर तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २७ जुलै २०२६


## कर्मावर विश्वास माझा

कर्मावर विश्वास माझा,
अंधभक्तीवर नाही;
मी डोळे उघडे ठेवून जगतो,
गुडघे टेकवून नाही.

दगडांना देव करून
माणसांना धूळ मानणाऱ्यांनो,
तुमच्या देवापेक्षा मला
रस्ते झाडणारा कामगार मोठा वाटतो.

माझ्या हातावरच्या घट्ट्या
माझी ओळख सांगतात;
तुमच्या कपाळावरचे टिळे
माणुसकीची खात्री देत नाहीत.

जो भुकेल्याला भाकर देतो,
तोच माझा संत आहे;
जो भीती विकून श्रद्धा कमावतो,
तो समाजाचा व्यापारी आहे.

मी प्रश्न विचारतो,
कारण माझा मेंदू अजून जिवंत आहे;
अंधभक्तीला शरण जाणं
माझ्या विवेकाचा अपमान आहे.

धर्म जर माणसाला तोडत असेल,
तर तो धर्म नसतो—व्यापार असतो;
देव जर अन्यायासमोर गप्प असेल,
तर तो देव नसतो—सत्तेचा दरबार असतो.

मला स्वर्गाची लालच नाही,
नरकाची भीती नाही;
अन्यायाविरुद्ध उभं राहणं
हीच माझी खरी उपासना आहे.

मी नशीबाच्या रेषांवर नाही,
माझ्या श्रमांच्या रेषांवर विश्वास ठेवतो;
कारण इतिहास भविष्य सांगणाऱ्यांनी नाही,
तर भविष्य घडवणाऱ्यांनी लिहिला आहे.

ज्या हातांनी संविधान उचललं,
त्याच हातांनी देश उभा राहिला;
ज्या हातांनी अंधश्रद्धा पसरवली,
त्यांनी माणूसपणाचा गळा दाबला.

माझा देव मंदिरात नाही,
तो शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यात आहे;
तो विटा उचलणाऱ्या मजुरात आहे,
तो ज्ञान देणाऱ्या शिक्षकात आहे,
तो रुग्ण वाचवणाऱ्या डॉक्टरात आहे.

म्हणून सांगतो—
कर्मावर विश्वास माझा,
अंधभक्तीवर नाही;
विवेकाची मशाल हातात आहे,
ती कधी विझणार नाही.

वादळं येतील,
धमक्या येतील,
शापही मिळतील;
पण प्रश्न विचारणारी पिढी
कधीच पराभूत होणार नाही.

कारण—
क्रांती देवळात जन्मत नाही,
ती विचारांत जन्मते.
इतिहास आरतीने बदलत नाही,
तो विद्रोहाने बदलतो.

आणि...
कर्म माझा धर्म आहे,
विवेक माझी जात;
माणुसकी माझा श्वास आहे,
आणि विद्रोह माझी औकात!

**डॉ बाळासाहेब लिहिणार**

# ग्रामीण जीवनाचा जिवंत दस्तऐवज ठरलेला ज्ञानेश्वर गायके यांचा 'माझ्या गावाची वाट' हा काव्यसंग्रह



मराठी साहित्यविश्वात ग्रामीण कविता ही नेहमीच मातीचा गंध घेऊन वाचकांच्या मनात पोहोचत आली आहे. काळ बदलला. शेती बदलली. गाव बदलले. माणसांची जगण्याची पद्धत बदलली. पण मातीशी असलेले नाते आजही तितकेच घट्ट आहे. त्या नात्याला शब्दरूप देणारा कवी वाचकांच्या मनात कायमचा घर करून जातो. कवी ज्ञानेश्वर कचरू गायके यांचा माझ्या गावाची वाट हा काव्यसंग्रह अशाच संवेदनशील लेखणीतून जन्माला आलेला आहे.या संग्रहाचे प्रकाशन लीला साहित्य पब्लिकेशन पुणे यांनी केले असून पुस्तकाची अक्षरजुळणी आणि आकर्षक मांडणी वनिता चौधरी यांनी केली आहे. संग्रहातील प्रत्येक पानावर असलेली रेखाचित्रे कवितेच्या आशयाशी एकरूप होतात. ती केवळ सजावट नसून कवितेतील भावनांचा विस्तार आहेत. पुस्तकाचे मुखपृष्ठ साधे असले तरी आशयाची खोली त्यातून जाणवते. उत्तम कागद. सुबक छपाई. स्वच्छ अक्षररचना आणि विषयाला साजेशी मांडणी यामुळे पुस्तक हातात घेतल्यावर ते वाचून पूर्ण करण्याची उत्सुकता निर्माण होते.या संग्रहात सत्तरहून अधिक कविता आहेत. या कविता प्रेमाच्या कल्पनारम्य विश्वात रमणाऱ्या नाहीत. त्या थेट गावाकडच्या मातीशी जोडलेल्या आहेत. शेत. पाऊस. दुष्काळ. नाती. आई. मित्र. संतपरंपरा. समाजातील विसंगती. माणुसकी. काळाचा बदल. संघर्ष. जीवनाचे तत्त्वज्ञान आणि बदलत्या ग्रामीण वास्तवाचा वेध या सर्व विषयांना कवीने आपल्या सहजसुंदर भाषेत स्पर्श केला आहे.संग्रहाची सुरुवातच मातीने तारलं या कवितेने होते. या कवितेत माती ही केवळ जमीन नसून जीवनाची जननी आहे अशी भूमिका कवी मांडतो.माती जन्मली. मातीत वाढली.मातीनं घडली जनजाणती.या काही ओळींतून कवीचा संपूर्ण जीवनदृष्टिकोन समोर येतो. मातीवर प्रेम करणारा माणूसच खऱ्या अर्थाने संस्कृती जपतो हा विचार अतिशय प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. ग्रामीण भागात जन्मलेल्या प्रत्येकाच्या मनात ही कविता आपलेपणाने घर करते.त्यानंतरची माझ्या गावाची वाट ही कविता संपूर्ण संग्रहाचा आत्मा म्हणावी लागेल. गावाकडे जाणारी वाट म्हणजे केवळ मातीचा रस्ता नाही. ती आठवणींचा झरा आहे. बालपणाची सावली आहे. आईच्या मायेचा स्पर्श आहे. हरवलेल्या आयुष्याचा शोध आहे. गावापासून दूर गेलेल्या प्रत्येकाला ही कविता पुन्हा आपल्या मातीत घेऊन जाते. ही कविता वाचताना अनेकांना स्वत:चे गाव डोळ्यांसमोर उभे राहिल्याशिवाय राहत नाही.माझ्या कन्नडच्या भूमीत या कवितेत कवीने आपल्या भूमीचा अभिमान व्यक्त केला आहे. जन्मभूमीवर प्रेम करणे म्हणजे दुसऱ्यांचा द्वेष करणे नव्हे. तर आपल्या संस्कृतीचे ऋण मान्य करणे होय. हा व्यापक दृष्टिकोन या कवितेत दिसून येतो.संग्रहातील ज्ञानदेव ही कविता विशेष उल्लेखनीय आहे.जगण्याचं भान. जीवनाचं ज्ञान.अमृताचं दान. ज्ञानदेव.अत्यंत मोजक्या शब्दांत संत ज्ञानेश्वरांचे संपूर्ण कार्य उभे करण्याची ताकद या कवितेत आहे. वारकरी संप्रदायातील श्रद्धा. भक्ती आणि ज्ञान यांचा संगम या कवितेत सहजपणे व्यक्त झाला आहे. अनावश्यक विस्तार न करता नेमकेपणाने भाव व्यक्त करणे ही कवीची ताकद येथे दिसते.मित्र तू भेटला ही कविता मैत्रीच्या नात्याचा भावस्पर्शी आविष्कार आहे.मित्र तू भेटला.अन् मिळालं मैत्रीचं नातं अमोल.आजच्या स्वार्थी युगात निस्वार्थ मैत्री अजूनही जिवंत आहे हा विश्वास ही कविता देते. कृत्रिमतेपासून दूर राहून साध्या भाषेत मोठा अर्थ सांगण्याची ताकद या कवितेत आहे.जीवनाचा हिशेब मांडणारी हिशोब ही कविता माणसाला अंतर्मुख करते. यश अपयश सुख दु:ख यांचा हिशेब मांडताना शेवटी उरते ती माणुसकीच हे कवी प्रभावीपणे सांगतो. त्याच धाटणीची हे सरलेल्या वर्षी ही कविता काळाच्या प्रवाहात हरवणाऱ्या आठवणी आणि आयुष्याचा बदलता प्रवास यांचे हळवे चित्र रेखाटते.तो लढतोय ही कविता सामान्य माणसाच्या संघर्षाला आवाज देते. हा संघर्ष फक्त शेतकऱ्याचा नाही. तर प्रत्येक कष्टकरी माणसाचा आहे. रोज जगण्यासाठी झगडणाऱ्या माणसाची वेदना कवीने वास्तववादी पद्धतीने व्यक्त केली आहे.आजार माणसांचे ही कविता समाजातील मानसिक विकारांवर नेमके बोट ठेवते. मत्सर. लोभ. अहंकार. स्वार्थ. दांभिकपणा यांसारखे आजार समाज पोखरत आहेत याची जाणीव करून देणारी ही कविता विचार करायला भाग पाडते.संग्रहातील एप्रिल फूल ही कविता विनोदी वाटली तरी तिचा आशय अत्यंत गंभीर आहे. आज माणूस दुसऱ्याला फसवण्यातच आनंद मानू लागला आहे. नातेसंबंधांतील विश्वास कमी होत चालला आहे. या बदलत्या वास्तवावर कवीने मिश्कील शैलीत भाष्य केले आहे.रंग कोणता दिला ही कविता संग्रहातील अत्यंत आशयघन कविता आहे. माणसाचे मूल्य त्याच्या जातीत धर्मात रंगात नसून त्याच्या कर्मात आहे हा व्यापक मानवतावादी संदेश या कवितेतून मिळतो. आजच्या सामाजिक परिस्थितीत अशा कविता अधिक महत्त्वाच्या ठरतात.या संग्रहातील सर्व कविता वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. कवीने कृत्रिम अलंकारांचा आधार घेतलेला नाही. शब्दांचे अवडंबर नाही. अनुभवांचे प्रदर्शन नाही. जे जगले तेच लिहिले. जे पाहिले तेच मांडले. म्हणूनच कविता मनाला भिडतात.कवीची भाषा ही या संग्रहाची सर्वात मोठी ताकद आहे. ग्रामीण बोलीचा सहज वापर. साधी शब्दरचना. ओघवती लय. आणि भावनेचा प्रामाणिकपणा यामुळे कविता सहज लक्षात राहतात. वाचकाला शब्दकोश उघडण्याची गरज पडत नाही. कविता थेट मनाशी संवाद साधतात.संग्रहातील अनेक कविता मुक्तछंदात असून काही कवितांमध्ये पारंपरिक लयही दिसते. त्यामुळे संग्रहात वैविध्य निर्माण झाले आहे. विषयांची पुनरावृत्ती जाणवत नाही. प्रत्येक कवितेत नवा अनुभव आणि नवी जाणीव आहे.समीक्षक म्हणून पाहताना काही कविता आणखी विस्ताराने लिहिल्या असत्या तर त्यांचा प्रभाव अधिक वाढला असता. काही ठिकाणी प्रतिमांचा वापर अधिक परिणामकारक होऊ शकला असता. मात्र या किरकोळ बाबी संग्रहाच्या आशयसमृद्धतेपुढे गौण ठरतात.ज्ञानेश्वर गायके यांच्या कवितांमध्ये ग्रामीण माणसाचा आत्मा बोलतो. शेतात घाम गाळणारा शेतकरी. गाव सोडून शहरात गेलेला तरुण. आईच्या मायेची सावली. संतांच्या विचारांनी समृद्ध झालेली संस्कृती. निसर्गाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते. आणि समाजातील बदल यांचे जिवंत चित्र या संग्रहात सातत्याने दिसते.आजच्या डिजिटल युगात गाव हरवत चालले आहे. माणसं जवळ असूनही मनाने दूर जात आहेत. अशा वेळी माझ्या गावाची वाट हा काव्यसंग्रह वाचकाला पुन्हा आपल्या मातीकडे वळवतो. आपल्या माणसांची आठवण करून देतो. आपल्या संस्कृतीशी पुन्हा जोडतो.हा संग्रह केवळ कवितांचा संच नाही. तो ग्रामीण महाराष्ट्राच्या भावविश्वाचा दस्तऐवज आहे. मातीवर प्रेम करणाऱ्या. गावाशी नाळ जपणाऱ्या. माणुसकीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक वाचकाने हा संग्रह आवर्जून वाचावा असा आहे.कवी ज्ञानेश्वर कचरू गायके यांनी आपल्या संवेदनशील लेखणीतून ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्र मराठी साहित्याला दिले आहे. त्यांची कविता वाचताना मातीचा सुगंध दरवळतो. नात्यांचा ओलावा जाणवतो. संघर्षाचे वास्तव दिसते. आणि शेवटी माणूस म्हणून जगण्याची नवी उमेद मिळते.माझ्या गावाची वाट हा काव्यसंग्रह मराठी ग्रामीण कवितेच्या परंपरेत निश्चितच लक्षात राहणारा आणि अभ्यासक तसेच सर्वसामान्य वाचकांच्या संग्रहात स्थान मिळवणारा महत्त्वाचा काव्यसंग्रह ठरेल.

**माझ्या गावाची वाट कवी - ज्ञानेश्वर कचरू गायके,**
**प्रकाशक- लीला साहित्य पब्लिकेशन पुणे, पृष्ठसंख्या 91, मूल्य 150 रुपये**